अत्यंत तातडीचे

# मुंबई विद्यापीठ

क.वि.क./आयसीसी/२०२०–२१/०२
दिनांक – २६ नोव्हेंबर,२०२०

विषय – मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १५७३७/२०१९ वर दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०–२१ मधील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

संदर्भ – १. शासन निर्णय क्रमांक –बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६–ब दिनांक २४ नोव्हेंबर, २०२०.
२. शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक/उशिसं/२०२०/विद्यार्थी प्रवेश/मवि–१/७८४६, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२०.

परिपत्रक :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था प्राचार्य/संचालक, विद्यापीठ विभागप्रमुख/संचालक (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळून) यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्रमांकाच्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्रमांक २, शिक्षण संचालनालयाचे पत्रानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणा–या व मुंबई विद्यापीठाशी संलग्न असणा–या महाविद्यालयातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत निर्देश दिलेले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र. १५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून संबंधित प्रशासकीय विभागांनी सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थामधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० पूर्वी एसईबीसी वर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आला नसेल अशा एसईबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातुन प्रवेश देण्यात यावे.

सदर परिपत्रक आणि शासन निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था प्रमुख/संचालक, स्वायत्त महाविद्यालये व संस्था प्राचार्य/संचालक, (अल्पसंख्याक महाविद्यालये वगळुन)

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव